# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/ ७६३/२०१७ पुणे शहर दिनांक २१ /०९/२०१७

पुणे शहरात येरवडा वाहतुक विभागात पुणे नगर रोडवर रामवाडी अंडरपास या ठिकाणी रोडवर स्लॅब टाकणेकरीता तसेच, एअरपोर्ट कडून येणारा मार्ग हा रामवाडी अंडरपासला जोडणेचे काम पुणे महानगरपालिके तर्फे करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, खालील प्रमाणे दि.२३/०९/२०१७ पासुन काम संपेपर्यंत तात्पुरते आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. कल्याणीनगर चौकाकडून लोहगाव, विश्रांतवाडी, एअरपोर्ट, विमाननगरकडे रामवाडी अंडरपास मार्गे जाणा-या सर्व वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदर वाहनांनी चव्हाण चौक मार्गे अगर अॅडलॅब चौक मार्गे कल्याणीनगर चौक, शास्त्रीनगर चौक या मार्गाचा वापर करावा.

२. वडगावशेरी, रामवाडी यामार्गे नवीन एअरपोर्टला येणा-या वाहनाना प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदर वाहनांनी वडगावशेरी चौकातुन विमाननगर मार्गे नवीन एअरपोर्ट रोडचा वापर करावा.

३. कल्याणीनगर नवीन एअरपोर्ट मार्गे नगरकडे जाणा-या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदर वाहनांनी चव्हाण चौक मार्गे अगर अॅडलॅब चौक मार्गे कल्याणीनगर चौक, शास्त्रीनगर चौक या मार्गाचा वापर करावा अगर बिशप स्कुल रामवाडी पोलीस चौक नगररोड यामार्गाचा वापर करावा.

४. पुण्याकडून येणारी व नवीन एअरपोर्टकडे जाणारी वाहतुक ही सदयस्थितीप्रमाणे चालू राहिल.

तरी सर्व नागरिकांनी वाहतुक ड्रायव्हर्शन नुसार मार्गाचा वापर करुंन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवहान पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ८६३१/२०१७ पुणे शहर, दिनांक १९.०९.२०१७

**विषय - नवरात्र उत्सव : २०१७ निमीत्त चतु:श्रृगी मंदिर भागातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात येणा-या बदला बाबत.**

--------oo-------

पुणे शहरात दिनांक २१.०९.२०१७ ते दिनांक ३०.०९.२०१७ या कालावधीत "नवरात्र उत्सव" साजरा होत आहे. नवरात्र उत्सव कालावधीमध्ये भाविक मोठ्या संख्येने चतु:श्रृंगी मंदीर, या ठिकाणी दर्शनास येतात. भाविकांना सुखरुपपणे दर्शन घेता यावे तसेच वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालणे इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२ दिनांक-२७.०९.१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अशोक मोराळे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे वाहतुकीस बंद रस्ते व पार्कींग व्यवस्थे बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

## <u>*चतु:श्रृंगी माता मंदीर*</u>

१. सन्मान को.ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मिलीटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसेसकडे जाणारा रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे. सदर रोडवरुन जाणा-या वाहनचालकांनी स्व.पानकुंवर फिरोदिया पथ या मार्गाचा वापर करावा.

२. सेनापती बापट रोडवरील एन.एस.ई.बी. ऑफीस समोरील रस्ता (पंक्चर) बंद करण्यात येणार आहे. वाहनचालकांनी एस.बी.जंक्शन व शिवाजी हौसिंग सोसायटी चौकातुन यु टर्न घेवुन इच्छीत स्थळी जावे.

## <u>*पार्कींग*</u>

१. चतु.श्रृंगी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या नागरीकांनी संभाव्य कारवाई व गैरसोय टाळणेसाठी त्यांची वाहने शासकीय तंत्र निकेतन मैदान (ग्राऊंड) येथे पार्क करावीत.

२.शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे मैदानावर वाहनांना पार्कींगकरीता जाण्यासाठी दिशादर्शक फलक लावण्यात आले असुन वाहनचालकांनी सदर ठिकाणी जाण्याकरीता स्व. पानकुंवर फिरोदिया पथ या मार्गाचा वापर करावा.

तरी नागरीकांनी व वाहन चालकांनी वरील नमूद निर्बंध केलेल्या मार्गावर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गाचा वापर करुन पोलीसांना सहकार्य करावे.

# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ७६३४/२०१७ पुणे शहर, दिनांक २१.०९.२०१७

**विषय :- नवरात्र उत्सव : २०१७ निमीत्त श्री.महालक्ष्मी मंदिर,सारसबाग भागातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात येणा-या बदला बाबत.**

--------oo-------

दिनांक २१.०९.२०१७ रोजीपासून श्री. महालक्ष्मी मंदीर सारसबाग तर्फे सार्वजनिक नवरात्र महोत्सव साजरा करण्यात येत असून दिनांक- २२.०९.२०१७ रोजी, सकाळी ०६.३० ते ०८.०० या वेळेत शालेय विद्यार्थ्यांचे एकत्रित श्रीसुक्त/अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम असल्याने सदर कार्यक्रम दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अशोक मोराळे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक- २२.०९.२०१७ रोजी, सकाळी ०६.३० ते श्रीसुक्त/अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपे पर्यंत खालील वाहतुकीस बंद रस्ते बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

१. बाजीरावरोड वरील जमनलाल बजाज पुतळा ते सावरकर चौक या मार्गावरील वाहतुक बंद करण्यात येत आहे. जेधे चौकाकडून येणारी वाहतुक जमनालाल बजाज पुतळा येथून पुरम चौकाकडे वळविण्यात येईल.
२. मित्रमंडळ चौकाकडून येणारी वाहतुक सावरकर चौकापासून पुरम चौकाकडे बंद करण्यात येईल सदर मार्गावरील वाहने ही सिंहगड रोड जंक्शन चौकाकडे वळविण्यात येतील.

तरी नागरीकांनी व वाहन चालकांनी वरील नमूद निर्बंध केलेल्या मार्गांवर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गाचा वापर करून पोलीसांना सहकार्य करावे.